प.क्र. २०१५/ नोअ/जशिअ/
जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी
दि.१८.०४.२०१५

प्रति,

नोडल अधिकारी,
पदनाम ------------------------------
गावांचे नांव ----------------------------

**विषयः जलयुक्त शिवार अभियान सर्वव्यापी व गतिमान होण्यासाठी विशेष मोहीम राबवणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन जिल्हयामध्ये जलयुक्त शिवार अभियान १७० गावांमध्ये राबवण्यात येत आहे. प्रत्येकी ३ गावांसाठी एक नोडल अधिका-याची नेमणूक करण्यात आलेली आहे. दि.७, ९ व १० एप्रील २०१४ रोजी नोडल अधिका-यांनी ग्रामसभा घेतली आहे. काही ठिकाणी ग्रामसभेचे आयोजन चांगले करण्यात आलेले होते. परंतू काही ठिकाणी ग्रामसभेस प्रतिसाद मिळालेला नाही. तसेच काही गावांमध्ये अद्याप काम सुरु झालेले नाही, ही बाब अत्यंत गंभीर आहे. अजुनही काही गावांमध्ये तलाठी, ग्रामसेवक व कृषि सहायक संयुक्तपणे जलयुक्त शिवार अभियान राबवण्यासाठी संपूर्ण ताकदीने काम करत नसल्याचे दिसून आले.

मा. प्रधान सचिव, जलसंधारण यांनी दि.१५.४.२०१५ रोजीच्या विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद येथील बैठकीत प्रत्येक गावांत मग्रारोहयो व लोकसहभाच्या माध्यमातून किमान रु.१५.००लक्ष चे काम करण्याचे निर्देशीत केलेले आहे. त्या अनुषंगाने कामाचे नियोजन करुन प्रत्यक्ष कामास सुरुवात करावी. तसेच मा. मुख्य सचिव यांनी दि. १७.०४.२०१५ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरन्समध्ये, वरीष्ठ अधिका-यांनी / नोडल अधिका-यांनी गावांमध्ये प्रत्यक्ष भेटी देऊन कामांना गती प्राप्त करुन दिल्यास जलयुक्त शिवार अभियान यशस्वी होईल असे अधोरेखीत केले आहे.

करिता आपणास पुनःश्च कळविण्यात येते की, आपणास जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत नेमण्यात आलेल्या गावाचे पुर्णतः पालकत्व स्विकारुन योजना यशस्वी करावी. तसेच जे अधिकारी सदर योजनेबाबत अजुनही उदासीन आहेत किंवा त्यांनी जाणीवपुर्वक दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आल्यास तशी नोंद संबंधीताच्या गोपनीय अहवालात घेण्यात येईल. करिता सदर योजनेसंबंधीत आपण केलेल्या कामाचा आढावा घेण्यात येणार असून आपण केलेल्या कार्यवाहीचा वृत्तांत व अहवालासह दि.२३.०४.२०१५ रोजी १६.०० वाजता, जिल्हाधिकारी कार्यालय परभणी येथे हजर राहावे.

**जिल्हाधिकारी, परभणी**

**प्रतिलीपीः मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. परभणी**

**जिल्हाधिकारी, परभणी**